# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**पोष्टः शिरडी - ४२३ १०९.**

तालुका - राहाता, जिल्हा – अहमदनगर (महाराष्ट्र)

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) (ऑपरेटर) - २५८५००, प्रकाशने विभाग - (०२४२३) २५८८००, २५८८०८.
Website – www.sai.org.in E-mail saibaba@sai.org.in / publication@sai.org.in


# प्रकाशने विभागासाठी 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo छपाई करून पुरवठा करणेबाबतची ई-निविदा.

**निविदा शुल्क रु.५,७००/- मात्र**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**पोष्ट - शिर्डी – ४२३ १०९, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर**
**दूरध्वनी क्रमांक - (०२४२३) २५८८००/२५८८०८.**
Website – www.sai.org.in E-mail saibaba@sai.org.in / publication@sai.org.in

# ई-निविदा सुचना

| अ.नं. | ई-निविदेचा तपशील | निविदा शुल्क रुपये | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | प्रकाशने विभागासाठी 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo छपाई करून पुरवठा करणेकामीची ई-निविदा. | ५,७००/- | ९५,०००/- |

०१. ई-निविदेची सविस्तर माहिती शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

०२. निविदा ऑनलाईन डाऊनलोड व अपलोडींगसाठी दि.१३/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन ते दि.२६/०९/२०२४ सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

०३. निविदा शुल्क व बयाणा रक्कम www.mahatenders.gov.in या शासनाचे संकेतस्थळावर जमा करणेत यावी.

०४. इच्छुक निविदाकाराची मागील ०३ आर्थिक वर्षातील (सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३) सरासरी वार्षिक उलाढाल किमान रुपये १ कोटी मात्र (अक्षरी रुपये एक कोटी मात्र) असावी आणि छपाई व्यवसायाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असावा.

०५. इच्छुक निविदाकाराने ई-निविदेसोबत सादर करावयाचे सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती सही शिक्यानिशी ऑनलाईन स्कॅन करुन सादर करावयाच्या आहेत, Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

०६. छपाई करावयाचे सद्यस्थितीत संस्थानकडे उपलब्ध असलेले 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo चे नमुने शिर्डी कार्यालयाकडील प्रकाशने विभागात रविवार वगळतां इतर दिवशी कार्यालयीन (स.१० ते सायं.६ पर्यंत) वेळेत समक्ष पाहणेसाठी उपलब्ध आहेत, कृपया नमुने पाहून व इतर अटी-शर्ती वाचून ई-निविदेत सर्वसमावेशक दर नमुद करावेत.

०७. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.२८/०९/२०२४ रोजी उघडणेत येतील.

०८. ई-निविदेसाठी प्री-बीड बैठक दि.१८/०९/२०२४ रोजी संस्थानचे शिर्डी येथील समाधी मंदिर परिसरातील लेंडी बागेजवळील "साई सभागृह" येथे आयोजित करणेत येईल, यात काही बदल झाल्यास नवीन तारीख संस्थानचे संकेतस्थळावर कळविणेत येईल.

**०९. तांत्रिक कागदपत्रांसह व निविदेतील तपशिलाप्रमाणे Bill of Quantity (BOQ) तसेच, निविदेत नमुद मुद्दा क्र.०२ मधील अट क्र.१ ते ५ नुसार प्रत्यक्षात नमुने सादर केल्यानंतरच तांत्रिक निविदेत पात्र ठरवून वाणिज्यीक निविदा उघडणेत येतील.**

१०. संस्थान प्रशासनाने कोणतीही ई-निविदा अंशतः किंवा संपूर्ण स्वीकारणेचा अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क राखून ठेवला आहे. त्याबाबतची कोणतीही कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाहीत.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
## प्रकाशने विभाग

**निविदेचा तपशिल** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे प्रकाशने विभागासाठी 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo छपाई करून पुरवठा करणेकामीची ई-निविदा.

**(०१) ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे - (ई-निविदा ज्या संस्थेच्या नांवाने सादर करणेत येणार आहे, त्या नांवाने असलेल्या खालील कागदपत्रांच्या मुळ प्रती ऑनलाईन Scan Copies अपलोड करणे अनिवार्य आहे.)**

१.१ संस्थेचे अद्ययावत प्रेस नोंदणी दाखला अथवा त्यासंबंधीत तत्सम शासकीय परवाना.

१.२ संस्थेचे वस्तू व सेवा कर नोंदणी क्रमांक प्रमाणपत्र (Goods Service Tax Registration Certificate) **किंवा** याकामी नोंदणी केल्याची पावती (Online GST Registration Certificate)

१.३ संस्थेचे आयकर नोंदणी प्रमाणपत्र (PAN CARD)

१.४ मागील ३ आर्थिक वर्षात (२०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३) संस्थेची सरासरी वार्षिक उलाढाल रुपये १ कोटी मात्र (अक्षरी रुपये एक कोटी मात्र) व त्यापेक्षा जास्त असलेबाबत संस्थेचे शासनमान्य लेखापरीक्षक (सीए) यांचे सही-शिक्यानिशी विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.

१.५ **कोणत्याही सरकारी / निमसरकारी / खाजगी संस्थेचे मागील ३ वर्षात 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo च्या किमान रु.पंचवीस लाख मात्र किंमतीची छपाईकामे केलेल्या किमान एक छपाई आदेशाची प्रत व सोबत पुरावा म्हणून साहित्य पुरवठा चलनाच्या प्रती व बिले.**

१.७ कोणत्याही संस्थेने आपले संस्थेचे नांव काळया यादीत समावेश केले नसलेबाबत स्वयं-घोषणा पत्र (Self-Declaration Letter).

१.८ इच्छूक निविदाधारकाचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दयावयाचे हमी पत्र.

**(०२) निविदाधारकाने विषयांकित फोटोंचे नमुने सादर करण्याची पद्धत-**

२.१ निविदाधारकाने निविदा भरलेल्या 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo चे नमुने कापडी पिशवीमध्ये सिलबंद करुन भरलेल्या साहित्याची यादी व नमुने संस्थानचे प्रकाशने विभागामध्ये दि.१८.०९.२०२४ ते दि.२६.०९.२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत जमा करणे अनिवार्य राहील. कापडी पिशवीवर साहित्याचे नाव व आपले फर्मचे नांव लिहीलेले असावे. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२.२ प्रत्येक साहित्याचा उच्चत्तम दर्जाचा प्रत्येकी एकच नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करु नयेत. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

२.३ निविदा भरलेल्या साहित्यांची यादी नमुने सादर करतांना सोबत सादर करणे आवश्यक आहे.

२.४ निविदाधारकाने 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo चे नमुने निवडीसाठी देतांना असे नमुने द्यावेत की, पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच नमुन्याच्या साहित्यांचा संस्थानला पुरवठा होईल.

२.५ **महत्वाचे :-** निविदेतील तपशिलानुसार (Specification) 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo छपाईच्या योग्य (उचित) दर्जासाठी, सदरील साहित्याची तपासणी करणाऱ्या आणि राज्य व केंद्र सरकार यांच्यासाठी तत्सम काम केलेल्या,सखोल अनुभव असणाऱ्या प्रतिष्ठित चाचणी संस्था/प्रयोगशाळा यांच्याकडून साहित्य छपाईचे नमुने प्रमाणित करून घेऊन त्याबाबतचा वैध पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

## (०३) पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा शुल्क व बयाणा रक्कम –

३.१ छपाई करुन पुरवठा करावयाचे साहित्याचा म्हणजेच, 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo चा **सविस्तर तपशील** (जसे, Technical Specifications, डिझायनिंग, कागदाचा प्रकार, छपाई करावयाची संख्या, बायडींग, पॅकींग आदि बाबींचा) Bill of Quantities (BOQ) मध्ये दिलेला आहे. (**महत्वाचे) :-** या सविस्तर तपशीलाचा अभ्यास करुनच, इच्छुक निविदाधारकाने BOQ मध्ये सर्वसमावेशक दर नमूद करुन, विषयांकित निविदा ऑनलाईनच सादर करावयाची आहे.

३.२ इच्छुक निविदाधारकाने BOQ मध्ये नमूद केलेल्या 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo चे नमुने समक्ष पाहूनच निविदा भरावी. BOQ मध्ये देणेत आलेली माहिती आणि नमुना यामध्ये काही विसंगती असल्यास निविदेचे प्री-बीडमध्ये माहिती द्यावी किंवा समक्ष पाहणीसाठी आलेनंतर प्रकाशने विभागाकडे याबाबत सविस्तर तपशील विचारुनच निविदा भरावी. याबाबत निविदा मंजूरीनंतर कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. निविदाधारकाने सर्वच पर्यायांचा अभ्यास करुन BOQ मध्ये दर भरावेत.

३.३ ई-निविदा शुल्क रक्कम रु.५,७००/- मात्र (पाच हजार सातशे) व बयाणा रक्कम रु.९५,०००/- मात्र (पंच्यान्नव हजार मात्र) शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन भरावी.

## (०४) निविदाधारकांसाठी सुचना-

४.१ ई-निविदा दि.१३/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दि.२६/०९/२०२४ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

४.२ ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेले कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाही.

४.३ ई-निविदेसाठी प्री-बीड बैठक दि.१८/०९/२०२४ रोजी शिर्डी येथील समाधी मंदिर परिसरातील लेंडी बागेजवळील "साई सभागृह" येथे आयोजित करणेत येईल.

४.४ **महत्वाचे :-** शक्य झाल्यास दि.२८/०९/२०२४ रोजी तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडणेत येतील. तांत्रिक निविदेसोबत Online सादर केलेल्या कागदपत्रांची व संस्थानचे प्रकाशने विभागाकडे प्राप्त नमुन्यांची पडताळणी केलेनंतर तसेच ई-निविदेच्या अटी-शर्ती पूर्ण होत असतील तरच, वाणिज्यिक निविदा (Commercial Bid) उघडणेत येईल अन्यथा निविदा विचारात घेतली जाणार नाही.

४.५ ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी संपर्क व्यक्ती/प्रतिनिधीचे दुरध्वनी क्रमांक स्पष्टपणे नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या इच्छुक निविदाधारकांना वाणिज्यिक निविदा (Commercial Bid) उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

## (०५) ई-निविदेत सर्व कर व इतर अनुषंगिक खर्चासह सर्वसमावेशक दर नमूद करणे-

५.१ ई-निविदेमध्ये ऑनलाईन दर नमूद करतांना GST,TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर, लेबर चार्जेस, पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, जकात, वाराई वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार / प्रकाशने विभागामध्ये पोहोच करणेचा अथवा प्रकाशने विभागाचे सुचनेनुसार निश्चित स्थळी पोहोच करण्याचा वाहतूक खर्च या सर्व बाबींचा विचार करूनच सर्वसमावेशक दर नमूद करावेत, म्हणजेच नमूद करणेत आलेले दर हे सर्व करांसहीत व शिर्डी पोहोचचे असावेत.

५.२ शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर निविदाधारक / पुरवठादार यांचेवर बंधनकारक राहतील, आणि त्यानुसार संबंधित पुरवठादाराचे सदर रक्कम बीलातून थेट कपात करण्यात येईल. शासनाने दि.०१.१०.२०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्र.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

५.३ पुरवठा आदेश दिल्यानंतर निविदेमध्ये / पुरवठा आदेशात नमूद दरामध्ये ज्या करांचा समावेश असेल त्यांचे दरामध्ये शासनाने काही बदल (कमी / जास्त) केल्यास त्यानुसार पुरवठा आदेशातील दरामध्ये बदल करण्यात

येईल. सदर बदल हा शासनाचे सुचना (Notification) ज्या दिनांकाला निर्गमित होईल त्या दिनांकापासून पुढील कामासाठी / पुरवठयासाठी लागु राहील.

## (०६) ऑनलाईन निविदा उघडण्याची कार्यपद्धती-

६.१ निविदेचा डाऊनलोड कालावधी संपल्यानंतर प्रथमत: खरेदी समितीच्या सभेत तांत्रिक ई-निविदा (Technical Bid) उघडणेत येतील व पात्र ठरणा-या निविदाधारकांचेच व्यावसायिक निविदा (Commercial Bid) खरेदी समितीच्या सभेत उघडणेत येतील.

## (०७) छपाई कामाच्या महत्वाच्या सूचना –

७.१ कार्यादेशाप्रमाणे छपाई करणेचे काम सुरु करणेपूर्वी विहित वेळेत मसुदा प्रकाशने विभागाकडून तपासून घेऊन, मान्य केल्यानंतर व त्याबाबतचे (लेखी) अंतिम संमती पत्र प्राप्त झालेनंतरच, छपाईचे काम सुरु करावे. नमुना व प्रुफ मान्य करुन न घेतलेली छपाई स्वीकारली जाणार नाही.

७.२ पात्र निविदाधारकांने छपाईचे काम पुर्ण झाल्यावर, छपाई मसुद्याची / डेटाची Open व *.pdf format ची सीडी तयार करुन संस्थानकडे हस्तांतरीत करावयाची आहे. त्याशिवाय जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

७.३ 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo ची छपाई करणेपुर्वी ०५ नग डमी (नमुना) पहाणी / तपासणीकामी प्रकाशने विभागाकडे पाठविणे बंधनकारक राहिल. आपणास BOQ मध्ये नमुद केलेल्या कागदावरच पहिल्या लॉट पासून शेवटच्या लॉटपर्यंत नमुद साहित्याची छपाई करावी लागेल. इतर कोणत्याही कागदावर छपाई करु नये. BOQ मध्ये नमुद केलेल्या कागदा-व्यतिरिक्त छपाई केल्याचे निदर्शनास आलेस, आपली अनामत रक्कम व देयकाची रक्कम संस्थान खाते जमा (जप्त) करण्यात येईल. तसेच ई-निविदेतील / कार्यादेशातील अथवा करारातील एक किंवा अनेक अटी-शर्तीचे भंगाबाबत दंडात्मक कारवाई करुन संबंधित पुरवठादारास काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

७.४ संस्थानचा छपाई कामाचा मजकूर हा फक्त संस्थानचे कार्यादेशानुसार संबंधित 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo ची छपाई करण्यासाठीच वापरणेत यावा. सदरहू छपाई कामाचे मजकुराचा दुरुपयोग करुन संस्थान व्यतिरिक्त त्रयस्थ व्यक्तीस अथवा संस्थेस अथवा इतर कोणासही नमुद साहित्यांची छपाई करुन दिलेचे आढळून आल्यास,कॉपी राईट्स ॲक्टअंतर्गत तसेच करारातील अटी-शर्तीचे भंगाबाबत संबंधित पुरवठादारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## (०८) साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण-

८.१ निविदा मंजूरीनंतर, कार्यादेशात नमूद केलेल्या साहित्याचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे भांडार विभागाचे मध्यवर्ती भांडारात किंवा प्रकाशने विभागाचे उपभांडारात अथवा प्रकाशने विभागाचे निर्देशानुसार विहित व निश्चित करणेत आलेल्या ठिकाणी / जागेवर करावा लागेल.

## (०९) सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-

९.१ ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo चा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर साहित्याचे पुरवठा आदेशाच्या एकुण रकमेच्या **३%** (तीन टक्के) इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर/कार्यादेश दिलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम नमुद साहित्यांचा पुरवठा व्यवस्थितरित्या पूर्ण केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

९.२ पात्र निविदाधारकांस निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर/कार्यादेश दिलेनंतर, कार्यादेशात नमूद केलेल्या एकूण रकमेच्या **३% (तीन टक्के) सुरक्षा अनामत** रक्कम धनाकर्ष / नेटबँकिंग आरटीजीएसव्दारे संस्थानचे बँक खात्यावर त्वरीत जमा करावी लागेल. तसेच कार्यादेशातील अटी-शर्तीनुसार, कामाची हमी म्हणून शिर्डी

येथे समक्ष येऊन, रुपये १००/- मात्र मुद्रांकांवर शासन अधिकृत नोटरी समोर त्वरीत करारनामा नोंदणीकृत करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याचे नोंदणीचा खर्च (शुल्क) पात्र निविदाधारकांस आदा करावा लागेल.

## (१०) 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo पुरवठा करण्याचे वेळापत्रक -

१०.१ 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo चा पुरवठा सुरू करणेपुर्वी, प्रथम प्रुफ (ज्यामध्ये आपणास दिलेल्या Hard & Soft Copy चे नमुनाबरहुकूम साहित्य / छपाई आहे कि नाही) तपासणी करुन घ्यावयाचा आहे. नमुद साहित्यांचे अंतिम प्रुफ आपणास तपासून दिलेनंतर विनाविलंब विभागाचे मागणीनुसार परिस्थितीनुरूप ठरवून दिलेल्या वेळेत छपाई कामाचा पुरवठा करावा लागेल. सदर मुदतीनंतर पुरवठा केल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल किंवा विलंब झाल्यास प्रसंगी इतर प्रेसधारकाकडून छपाई करून घेण्यात येईल. त्यासाठी येणारा जादा खर्च आपल्या बीलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

१०.२ 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo पुरविणेचा आदेश दिल्यानंतर प्रकाशने विभागाचे सूचनेप्रमाणे पुरवठा करावा लागेल.

१०.३ संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही गरजेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा **५० % पर्यंत** 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo ची मागणी संस्थानकडून झाल्यास नमुद साहित्यांचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

१०.४ छपाई करणेत आलेल्या 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo चा पुरवठा कधी, किती, कसा व केव्हा करावा याबाबत संस्थान प्रशासनामार्फत त्या-त्या वेळचे परिस्थितीनुरुप/वेळचेवेळी सूचना किंवा निर्देश देणेत येतील, त्यानुसार संबंधित पुरवठादाराने नमुद साहित्यांचा पुरवठा विनाविलंब करावयाचा आहे.

## (११) 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo स्वीकार करण्याची पध्दत –

११.१ पुरवठा कार्यादेशातील वर्णनाप्रमाणे 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo चा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच पुरवठा करणेत आलेल्या साहित्यांचे बील सादर करावे.

११.२ ज्या नमुन्यांच्या 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo च्या निविदा मंजुर होतील त्या सर्व मान्य झालेल्या (BOQ मध्ये नमूद) दर्जा व नमुन्याप्रमाणे पुरवाव्या लागतील. कमी दर्जाचे अगर वेगळ्या प्रकारच्या अथवा कागदामध्ये विसंगती वगैरे आढळल्यास छपाई केलेल्या साहित्यांचा संपुर्ण लॉटचा स्वीकार केला जाणार नाही. अशाप्रकारे पुरवठा झाल्यास ते आपणास परत न देता संस्थानमार्फत नष्ट करण्यात येतील.

११.३ पुरवठा करीत असलेली 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo ची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample पाहून नवीन छपाई केलेले साहित्य स्वीकारले जाते. तथापि नमुद साहित्य स्वीकारलेनंतरही एखादा लॉट अगर त्यातील काही साहित्य खराब आढळल्यास संपूर्ण लॉट किंवा पुरवठाधारकाशी केलेला करारच रद्द करण्याचे अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे.

११.४ 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo पुरवितांना पॅकींगचे बॉक्स BOQ मध्ये नमूद केलेप्रमाणे उत्तम दर्जाचे (7Ply) व निश्चित केलेल्या एकूण नग तसेच त्यावर आतील साहित्याची माहिती देणारे नग संख्येसह लेबल लावलेले असावे.

११.५ पुरवठा आदेशातील पुरवठा केलेले 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo कमी प्रतीचे आढळल्यास / BOQ मध्ये नमुद दर्जाची नसल्यास तसेच करारातील अटी / शर्तींचा भंग केल्यामुळे दंडात्मक कारवाई करण्याचा किंवा संपूर्ण करारच रद्द करण्याचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे.

## (१२) लॅब तपासणीची कार्यपध्दती-

१२.१ निविदेतील तपशिलानुसार (Specification) 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo छपाईच्या योग्य (उचित) दर्जासाठी, सदरील साहित्याची तपासणी करणाऱ्या आणि राज्य व केंद्र सरकार यांच्यासाठी तत्सम काम केलेल्या, सखोल अनुभव असणाऱ्या प्रतिष्ठित चाचणी संस्था/प्रयोगशाळा यांच्याकडून साहित्य छपाईचे नमुने प्रमाणित करून घेऊन त्याबाबतचा वैध पुरावा सादर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय माल/साहित्य ताब्यात घेतला जाणार नाही. प्राप्त अहवाल अवास्तव वाटल्यास

संस्थानमार्फत आवश्यकतेनुसार प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येईल व याकामी येणारा सर्व खर्च बिलातून वसूल करण्यात येईल. या तपासणीदरम्यानचे कालावधीमध्ये साहित्यांच्या प्रमाणात आदा करावयाचे देयकाचे रकमेतून २० % रक्कम राखीव ठेवणेत येईल.

१२.०२ 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo छपाई कामासाठी निविदेत/कार्यादेशात नमूद केलेले साहित्य वापरले नसल्यास, आर्थिक दंडात्मक कारवाई केली जाईल, प्रसंगी करार रद्द करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे.

## (१३) बील आदा करण्याची पध्दती-

१३.१ पुरवठा केलेल्या 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo चे देयके त्याचा दर्जा व नग संख्या योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठयापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१३.२ पुरवठा केलेल्या 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo चे देयक (बिल) सादर करतांना, देयकात कार्यादेशातील मजकूराप्रमाणेच तपशिल असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरुपात उल्लेख करु नये, त्यामुळे देयक आदा करणेस विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित पुरवठाधारकांवर राहील.

१३.३ पुरवठा झालेल्या 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo ची तपासेणी करुन, प्रत्यक्षात ताब्यात घेतलेल्या नगांचेच देयक (बिल) संस्थानकडे सादर केलेपासून ४५ दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

१३.४ निविदाधारकाने पुरविलेली 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo चा BOQ मध्ये नमुद दर्जाचे नसल्याच्या कारणावरुन संस्थानने नाकारल्यास, संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन नमुद साहित्यांची दुसरीकडून छपाई करावे लागल्यास, त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल. तसेच या कारवाईव्यतिरिक्त दंडात्मक कारवाई करुन संबंधित पुरवठादारास काळ्या यादीत टाकणेची कार्यवाही करणेत येईल, प्रसंगी करार रद्द करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे.

१३.५ शासन नियमानुसार आवश्यक असलेले शासकीय कर व इतर कपाती देयकातून (बिल) वसूल करण्यात येतील.

## (१४) आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद

१४.१ पुरवठा आदेशातील 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. प्रसंगी करार रद्द करणेचा अधिकार संस्थान राखून ठेवत आहे.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | मंजूर साहित्यापैकी पुरवठा न केलेल्या शिल्लक साहित्याच्या छपाई किंमतीच्या प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | मंजूर साहित्यापैकी पुरवठा न केलेल्या शिल्लक साहित्याच्या छपाई किंमतीच्या प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

१४.२ 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo पुरविणेचा आदेश दिलेनंतर ठरवून दिलेल्या पुरवठा तपशिलाप्रमाणे नमुद साहित्यांचा पुरवठा न झाल्यास, अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे नाकारल्या गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थान बाजार भावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशाइतक्या नगांचा दुसरीकडून छपाई करण्याची मुभा राहील. अशी छपाई केलेल्या साहित्यांसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या / नंतरच्या आलेल्या साहित्यांच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील. तसेच दंडात्मक कारवाई प्रसंगी करार रद्द करण्याचा अधिकार संस्थान प्रशासन राखून ठेवत आहे.

१४.३ पुरवठादाराने मागणीप्रमाणे मंजुर केलेले दराने व Specification मध्ये नमूद केलेप्रमाणे 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo चा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.

१४.४ निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती / नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा. युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo चा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि, सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहाणार नाही. पुरवठाधारकाला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे.

## (१५) निविदा वैधता कालावधी

१४.१ सदर ई-निविदेचा वैधता कालावधी निविदा भरण्याच्या अंतिम दिनांकापासून १२० दिवसांचा राहील.

## (१६) सर्व साधारण अटी शर्ती

१६.१ मुद्दा क्र.३ (३.१ ते ३.३) मध्ये नमूद केलेप्रमाणेच, BOQ मधील मजकूर पाहूनच त्याप्रमाणेच छपाई कामाचे दर भरावेत. BOQ मध्ये नमूद केलेल्या Specifications व अन्य बाबींशिवाय, इतर पर्याय देऊन अथवा इतर पर्यायी बाबी विचारात घेऊन देऊ केलेला दरांचा विचार केला जाणार नाही.

१६.२ इच्छुक निविदाकाराने तांत्रिक निविदेमध्ये (Technical Bid) दिलेल्या संस्थेच्या माहितीसंदर्भात संस्थानचे अधिकारी प्रसंगी संस्थेच्या कार्यस्थळावर ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊ शकतील, त्यावेळी संबंधितांना सहकार्य करून आवश्यक ती माहिती देणे बंधनकारक राहील.

१६.३ निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१६.४ पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

१६.५ यापुर्वी ज्या निविदाधारकांचे नाव ज्या कालावधीसाठी संस्थानने काळया यादीत (Black List) टाकलेले आहे, अशा निविदा तेवढया कालावधीसाठी विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच ज्यांनी पुरवठा आदेश दिलेनंतर मागणीनुसार/अटी-शर्तीनुसार छपाईचा पुरवठा केलेला नाही, अशा पुरवठादारांच्या निविदा कारवाई केलेपासून ०३ वर्ष विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१६.६ सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो मा.दिवाणी न्यायालय, राहाता न्यायालयाचे कार्यकक्षेत राहील.

१६.७ निविदाधारकांनी नमूद केलेल्या 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo निहाय दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल. यामध्ये गरजेनुसार निम्नत्तम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील आणि त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

१६.८ संस्थान व्यवस्थापनाने कोणतीही ई-निविदा अंशतः किंवा संपूर्ण स्वीकारणेचा अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क राखून ठेवला आहे. त्याबाबत कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

१६.९ सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

१६.१० छपाईकामी कुठल्याही प्रकारची अग्रीम रक्कम (Advance) दिली जाणार नाही.

१६.११ उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी / शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट / अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**प्रकाशने विभागासाठी 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व**

**3D Lenticular Photo ची छपाई करून पुरवठा करणेकामीची ई-निविदा.**

## निविदाधारकाची व्यावसायिक (Commercial) माहिती

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| ०१ | निविदाधारकाचे / संस्थेचे / फर्मचे नांव | |
| ०२ | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता | |
| ०३ | दूरध्वनी क्रमांक व ई-मेल पत्ता | कार्यालय - |
| | | प्रेस/दुकान - |
| | | निवास - |
| | | ई-मेल - |
| ०४ | संपर्क प्रतिनिधीचे नांव | |
| ०५ | संपर्क प्रतिनिधीचा दूरध्वनी क्रमांक | कार्यालय - |
| | | दूरध्वनी/मोबाईल क्रमांक - |
| ०६ | मालकाचे / भागिदारांची नांवे | |
| ०७ | शॉप / कंपनी ॲक्टनुसार नोंदणी क्रमांक | |
| ०८ | छपाई कारखान्याचा (प्रेस) नोंदणी क्रमांक | |
| ०९ | औद्योगिक रजिष्ट्रेशन क्रमांक (असल्यास) | |
| १० | आयकर नोंदणी क्रमांक (PAN Number) | |
| ११ | वस्तू व सेवा कर नोंदणी क्रमांक (GST Registration Number) | केंद्र |
| | | राज्य |
| १२ | बॅंकेचे नांव व शाखा | |
| १३ | बॅंकेचा खातेक्रमांक / खातेप्रकार | |
| १४ | बॅंक आयएफएससी कोड | |

दिनांक :-        /        /२०२४

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

# निविदाधारकाची तांत्रिक (Technical) माहिती

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| ०१ | प्रेसचा/कंपनीचा प्रचलीत भारतीय कायद्यानुसार नोंदणी क्रमांक | |
| ०२ | संबंधित व्यवसायात किती वर्षापासून आहात ? | |
| ०३ | संस्थेची इमारत स्वमालकीची कि भाडोत्री ? | |
| ०४ | कार्यस्थळाचे / इमारतीचे क्षेत्रफळ ? | |
| ०५ | उपलब्ध मशिनरींचा तपशिल - | |
| | (अ) दोन रंगात ऑफसेट छपाई मशीन संख्या | |
| | (ब) सहा रंगात इंटरडेक युव्ही ऑफसेट छपाई मशीन संख्या | |
| | (क) पेपर कटींग मशिन | |
| | (ड) पुर्णत: अथवा अंशत: स्वयंचलीत बायडींग व गमिंग मशिन/यंत्रणा उपलब्ध असल्यास त्याचा तपशिल व संख्या (Automatic Hard Case Binding & Gumming Machines) | |
| ०५ | स्वतःची 3D Photo छपाई तसेच, थर्मल सीटीपी / डिटीपी यंत्रणा आहे काय ? | |
| ०६ | फोटो लॅमिनेशन यंत्रणा उपलब्ध आहे काय ? | |
| ०७ | संस्थेत एकूण किती मनुष्यबळ कार्यरत आहे ? | |

दिनांक :- / /२०२४

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

<u>**इच्छुक निविदाधारकाचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**</u>
<u>**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र.**</u>

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**विषय - प्रकाशने विभागासाठी 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo ची छपाई करून पुरवठा करणेबाबतची ई-निविदा.....**

महोदय,

मी / आम्ही खाली स्वाक्षरी करणार, विषयांकित कामाची आपणांमार्फत प्रसिध्द करणेत आलेली निविदा वाचली. सदर निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून, त्या मला / आम्हाला मान्य आहेत. आपले अटी / शर्तींचे पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे / आहोत.

मी / आम्ही आपणांस या हमीपत्राव्दारे कळवू इच्छितो की, या निविदेतील मागणी केलेले दर हे प्रतिनगाप्रमाणे आहेत. आपले ई-निविदेमध्ये नमुद केलेल्या 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo साठी अटी व शर्तीत कळविलेप्रमाणे तसेच आपल्या मागणीप्रमाणे विहित कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी संस्थानाचे मध्यवर्ती भांडार अथवा प्रकाशने विभागाचे सुचनेनुसार, विहित ठिकाणी पोहोच करण्याची हमी देतो / देत आहोत. सदर साहित्यांची छपाई संख्या अंदाजे असल्यामुळे, वेळप्रसंगी संस्थानामार्फत मागणी झाल्यास, नमुद केलेल्या साहित्यांच्या छपाई संख्येपेक्षा **५० %** पर्यंत जास्त नगांची छपाई मी / आम्ही याकामी प्राप्त होणारे कार्यादेशातील मंजुर दराने पुरवठा करणेची हमी देत आहे / आहोत. तसेच व्यावसायिक निविदा अंतिम झालेनंतर, त्यावेळेच्या परिस्थितीनुरुप संस्थान व्यवस्थापनामार्फत मंजूर दराने देणेत येणारे कार्यादेशानुसार व त्यातील छपाई संख्येनुसार विषयांकित साहित्यांची छपाई करुन विहित वेळेत पुरवठा करणेची हमी देत आहे / आहोत.

निविदेत नमुद केलेल्या ज्या साहित्यांची निविदा मंजुर होईल, त्या मान्य दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर पुरवठा कार्यादेशाच्या एकुण रकमेच्या **३%** इतकी रक्कम ही सुरक्षा अनामत रक्कम म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत रोख अथवा विहित पध्दतीने भरणा करणे मला / आम्हांस मान्य असून, याकरीता निविदेसोबत जमा केलेली बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यासही संमती आहे. तसेच निविदेतील व कार्यादेशातील अटी-शर्तीनुसार, शासनमान्य नोटरीसमक्ष विषयांकित छपाई साहित्य पुरवठयापोटी रुपये १००/- मात्रचे गैरन्यायिक मुद्रांकांवर करारनामा स्वःखर्चाने नोंदणीकृत करुन देणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२४
ठिकाण -

आपला / आपले विश्वासू,

संस्थेच्या मालकाचे / भागीदाराचे नांव — स्वाक्षरी व शिक्का

०१.

०२.

**सोबत -** कागदपत्रे

## Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

०१. संस्थेचा / दुकान/ प्रेस नोंदणीचा अद्ययावत प्रमाणपत्र / दाखला

०२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

०३. पॅन कार्ड (Permanent Account Number)

०४. मागील ०३ वर्षाचे वार्षिक सरासरी उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र.

०५. कोणत्याही संस्थेत काळया यादीत नाव समाविष्ट नसलेबाबत स्वयं-घोषणापत्र

०६. कोणत्याही सरकारी / निमसरकारी / खाजगी संस्थेचे मागील ३ वर्षात 3D Desk Top Note Holder व 3D Lenticular Photo छपाईची किमान रूपये पंचवीस लाख मात्रचे छपाई काम केलेल्या कार्यादेशाची प्रत व साहित्य पुरवठा केलेल्या चलनाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

०७. निविदेतील तपशिलामध्ये (Specification) कळविलेप्रमाणे 3D Desk Top Note Holder (Chit/Note Pad) व 3D Lenticular Photo छपाईच्या योग्य (उचित) दर्जासाठी, सदरील साहित्याची तपासणी करणाऱ्या आणि राज्य व केंद्र सरकार यांच्यासाठी तत्सम काम केलेल्या, सखोल अनुभव असणाऱ्या प्रतिष्ठित चाचणी संस्था/प्रयोगशाळा यांच्याकडून साहित्य छपाईचे नमुने प्रमाणित करून घेऊन त्याबाबतचा वैध पुरावा सोबत जोडला आहे.

दिनांक :- / /२०२४

ठिकाण :-

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

**<u>इच्छुक निविदाधारकाने लेखापरिक्षक (चार्टर्ड अकौटंट) यांचे सादर करावयाचे प्रमाणपत्र .</u>**

# आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

मे.- - यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ या ०३ आर्थिक वर्षाची उलाढाल खालीलप्रमाणे प्रमाणित करणेत येत आहे.

| **अ.नं.** | **आर्थिक वर्ष** | **वार्षिक उलाढाल रुपये (रक्कम कोटी मध्ये)** |
|---|---|---|
| ०१ | सन २०२०-२१ | |
| ०२ | सन २०२१-२२ | |
| ०३ | सन २०२२-२३ | |
| | एकूण सरासरी उलाढाल | |

दिनांक - / /२०२४
ठिकाण -

लेखापरीक्षक (चार्टर्ड अकौटंट) यांचे
नाव / स्वाक्षरी / शिक्का
नोंदणी क्रमांक -